ePaper

"माझा विनायक मेटे करण्याचा डाव", अशोक चव्हाणांचं खळबळजनक विधान!



| वर्ष - 6 | अंक - 306 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- "आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपामुक्त महाराष्ट्र होणार
- पानसरेंच्या हल्लेखोरांना जेरबंद कधी करणार ?
- नक्षलवाद्यांचा पोलिसांवर हल्ला

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 21 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हिच ती वेळ!

## आमदार महेश लांडगे यांची भावनिक साद : अश्विनी जगताप यांच्या पाठिशी उभे राहण्याचे आवाहन

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या अत्यंविधीवेळी ज्या-ज्या लोकांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर सर्वपक्षीय शोकसभेत सहवेदना व्यक्त केल्या. ज्या लोकांनी १९८६ पासून दिवंगत जगताप यांच्यासोबत आतापर्यंत काम केले, असे अभिमानाने सांगितले. ते लोक पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप यांच्या पाठिशी का उभे राहिले नाही?, निवडणूक बिनविरोध होण्याची अपेक्षा असताना अश्विनी जगताप यांच्यावर दु:खातही प्रचारासाठी बाहेर पडण्याची वेळ का आणली? असा सवाल भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित केला. तसेच, लक्ष्मणभाऊंच्या माघारी अश्विनीताईंच्या पाठिशी उभे राहाण्याची हिच ती वेळ, असे आवाहनही आमदार लांडगे यांनी केले. भाजपा- शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांच्या प्रचारसाठी भाजपाच्या राष्ट्रीय नेत्या पंकजा मुंडे यांची प्रचार सभा झाली. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.**



आमदार लांडगे म्हणाले की, चिंचवडची पोटनिवडणुकीला अशाप्रकारे अचानक सामोरे जावे लागेल, असे कुणाच्याही ध्यानी-मनी नव्हते. लक्ष्मण जगताप यांच्या अंत्यविधीला सर्वपक्षीय नेते उपस्थित राहीले. त्यानंतर शोकसभा झाली. त्यावेळीसुद्धा सर्वपक्षीने नेते मंडळी उपस्थित राहीली. त्यांनी त्यांचे अनुभव व्यक्त केले. गेल्या ३८ वर्षांच्या शहराच्या राजकारणात कार्य केलेल्या जगताप यांच्या आठवणी सांगताना सर्वांचा कंठ दाटून येत होता. आपल्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबात एखादी दु:खद घटना घडली, तर त्याच्या दु:खात आपण सहभागी होतो. त्याला सावरण्याचा प्रयत्न करतो. एक सामाजिक संवेदनशीलता असते, ती संवेदनशीलता दाखवून ही निवडणूक बिनविरोध व्हावी. मनात राग नव्हे, दु:खाप्रती सहवेदना हवी होती. याकरिता आम्ही प्रामाणिक पुढाकार घेतला. मात्र, राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एका आपल्या बहिणीवर, लेकीवर दु:खाचा प्रसंग ओढावलेला असताना तीला प्रचारासाठी घराबाहेर पडण्याची वेळ आणली. लक्ष्मण जगताप असते, तर त्यांनी तुम्हाला तोडीस तोड उत्तर दिले असते, असा घणाघातही आमदार लांडगे यांनी केला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा विकास झाला. आयटी हब उभारण्यात आले. मात्र, या आयटीमध्ये काम करणाऱ्या लोकांनी राहण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर निवडले. कारण, या परिसराचा विकास आणि ओळख देशभरात झाली होती, हे विसरुन चालणार नाही, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे. शास्तीकर, अनधिकृत बांधकाम, रेडझोन हे प्रश्न कुणी निर्माण केले? भूमिपुत्रांपासून कामगारांपर्यंत अनेक नेत्यांनी आपल्याला आश्वासने दिली. मात्र, कुणी पूर्ण केली नाहीत. जे लोक पाच वर्षांत काय केले? असा प्रश्न विचारतात. त्यांना मला विचारायचे आहे. २००८ साली शास्तीकर कोणी लादला? पिंपरी-चिंचवडमध्ये रेडझोन लागू झाला त्यावेळी सरकार कुणाचे होते? अनधिकृत बांधकामे पाडली जात होती? त्यावेळी आपण डोळे झाकले होते का? त्यावेळी पालकमंत्री कोण होते? सत्ता कुणाची होती? याच लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी-चिंचवडकरांवरील शास्तीकराचे ओझे कमी करण्यासाठी तुमच्या पक्षाला रामराम ठोकला होता.

### अश्विनी जगतापांसाठी पंकजाताईंनी हात जोडले...

स्वर्गीय गोपिनाथ मुंडे यांचे पिंपरी-चिंचवड शहरावर अनेक उपकार आहेत. पंकजा मुंडे यांच्या रुपाने मुंडेसाहेबांचे दर्शन झाल्याची भावना येथील जनमानसाची आहे. आज पंकजा मुंडे यांनी अश्विनी जगताप निवडून याव्यात म्हणून लोकांना हात जोडले. आपल्या भागातील नागरिकांना आवाहन केले. कोपरा सभा, बैठका घेतल्या. याबाबत आमदार लांडगे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

> "निवडणुकांसाठी प्रत्येक पाच वर्षांना प्रत्येक पक्ष-नेता आपआपल्या परीने अजेंडा मांडत असतो. त्यानुसार काम करीत असतो. मात्र, लक्ष्मण जगताप यांनी निवडणूक झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासनू सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांना एकत्र घेवून काम करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कधीही पक्षीय भेदभाव केला नाही. अशा नेत्याच्या निधनानंतर जगताप कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला. आरोपांना उत्तर देण्यासाठी भाजपाचे नेते आहेत. ही निवडणूक उत्तर देण्याची नाही. ही निवडणूक २०१७ पासून भाजपाच्या माध्यमातून गेल्या ३८ वर्षांत लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या विकासकामे घेवून आम्ही लोकांसमोर जाणार आहोत.
> - महेश लांडगे, आमदार.

# अश्विनी जगतापांच्या विजयासाठी थेरगाव ग्रामस्थ एकवटले!

## केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांची उपस्थिती : पोटनिवडणुकीत मताधिक्याने विजय वण्याचा निर्धार

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना मित्र पक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या विजयासाठी थेरगावचे ग्रामस्थ एकवटले आहेत. सर्व थेरगाव ग्रामस्थांची केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत सोमवारी बैठक झाली. त्यामध्ये अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनीही मतदानादिवशी जास्तीत जास्त मतदारांना बाहेर काढून मतदान करून घेण्याचे आवाहन थेरगाव ग्रामस्थांना केले.**



थेरगाव येथीर बापुजीबुवा मंदिरात थेरगाव ग्रामस्थांनी घोंगडी बैठक झाली. यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, थेरगावचे ग्रासस्थ व शिवसेना खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे विधीमंडळातील पक्षप्रतोद भरत गोगावले, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, माजी उपमहापौर झामाबाई बारणे, युवासेना शहरप्रमुख विश्वजीत बारणे, माजी नगरसेवक निलेश बारणे, अभिषेक बारणे, सिद्धेश्वर बारणे, माजी नगरसेविका मनिषा पवार, विमल जगताप, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य संदिप गाडे, तानाजी बारणे, काळुराम बारणे, करिष्मा बारणे, नरेंद्र माने, संतोष गुलाब बारणे यांच्यासह थेरगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी शहरात केलेल्या विकासकामांचा उल्लेख करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोटनिवडणूक ही संधी असल्याचे सांगितले.

### अश्विनी जगताप यांचा विजय निश्चित...

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या विजयासाठी एकत्र आलेल्या थेरगाव ग्रामस्थांचे कौतुक केले. त्यांनी आयुष्यभर केलेल्या विकासकामांना थेरगाव ग्रामस्थांनी दिलेली ही पोचपावती असल्याचे ते म्हणाले. पोटनिवडणूक असल्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत कोणतीही कमी पडता कामा नये. थेरगाव ग्रामस्थांनी येत्या रविवारी होणाऱ्या मतदानादिवशी प्रत्येक मतदाराच्या घरांपर्यंत जाऊन त्यांना मतदानासाठी बाहेर काढावे, असे आवाहन त्यांनी केले. थेरगाव ग्रामस्थ एक झाल्याने अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय कोणीही रोखू शकणार नसल्याचे रावसाहेब दानवे म्हणाले.

# “आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपामुक्त महाराष्ट्र होणार!

## नाना पटोलेंचे विधान; मोदींवर टीका, “निवडणुका आल्या की फिरत राहतात

।पुणे । महाईन्यूज ।

**“आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाची एकही जागा निवडून येणार नसून, भाजपामुक्त महाराष्ट्र होणार आहे”, असा विश्वास काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार नाना पटोले यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ आलेले नाना पटोले यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना सदर विधान केले.**



### भाजपामुक्त महाराष्ट्र होणार

**कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीतदेखील भाजपाला पराभवाला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाची एकही जागा निवडून येणार नसून, भाजपामुक्त महाराष्ट्र होणार आहे”, अशा शब्दात काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर टीका केली**

“नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे दोघेजण निवडणुका आल्या की, फिरत राहतात. पण अन्य वेळी कुठेही दिसत नाहीत. दोन दिवसांपूर्वी अमित शहा यांनी पुण्यात विधान केल की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये भाजपाच्या सर्व जागा येणार असल्याचा संकल्प केला आहे. पण देशातील आणि राज्यातील जनतेने मोदी आणि शहा यांना चांगलेच ओळखले आहे. नुकत्याच झालेल्या पदवीधर निवडणुकीत भाजपाला नाकारले असून, कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीतदेखील भाजपाला पराभवाला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपाची एकही जागा निवडून येणार नसून, भाजपामुक्त महाराष्ट्र होणार आहे”, अशा शब्दात काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर टीका केली.नाना पटोले पुढे म्हणाले की, भाजपाचे नेते खासदार गिरीश बापट यांची काही दिवसांपूर्वीच भेट घेतली असून, त्यांची तब्येत ठीक नाही. गिरीश बापट यांना आरामाची गरज असताना भाजपा नेत्यांनी त्यांना कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत प्रचाराकरीता उतरविले आहे. यातून भाजपा नेतृत्वाची मानसिकता दिसून येत आहे. तसेच अमित शहा यांनादेखील पुण्यात यावे लागले. यामधून भाजपा नेतृत्वाच्या पायाखालची वाळू सरकल्याचे स्पष्ट होते, असे ते म्हणाले.

केंद्रीय यंत्रणा ताब्यात घेऊन भाजपाने शिवसेनेचे धनुष्यबाण शिंदे गटाला दिले आहे. पण आजवर देशात अशा घटना घडल्या. त्यानंतर त्या पक्षाला जनतेने नाकारले आहे. हेच एकनाथ शिंदे यांच्या बाबतीतदेखील घडणार, असे पटोले म्हणाले.

# राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, मानधनात वाढ करावी, या प्रमुख मागण्यांसह राज्यातील सुमारे दोन लाख अंगणवाडी कर्मचारी सोमवारपासून (ता.२०) बेमुदत संपावर गेले आहेत. दरम्यान, आज या संपाच्या पहिल्या दिवशी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी राज्याच्या एकात्मिक बाल विकास आयुक्तालयावर मोर्चा काढला आणि आयुक्तांलयासमोर जोरदार निदर्शने केली.

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली हा बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. राज्य सरकारने मागील साडेपाच वर्षांपासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ केलेली नसल्याचे या कृती समितीच्या राज्य अध्यक्ष शुभा शमिम यांनी सांगितले.

अन्य मागण्यांमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी, ग्रॅच्युइटी, मासिक पेन्शन लागू करावी, पोषण आहार ट्रॅकर हे अॅप मराठी भाषेतून उपलब्ध करून द्यावे, अंगणवाडीसेविकांना नवीन मोबाईल उपलब्ध करून द्यावा आदी मागण्यांचा समावेश आहे.

या बेमुदत संपाच्या पहिल्या दिवशी कृती समितीचा एक भाग असलेल्या अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मुंबई येथील कर्मचाऱ्यांनी एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तांवर मोर्चा काढला. यावेळी तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी आयुक्त रुबल अग्रवाल यांना निवेदन देण्यात आले आणि चर्चा करण्यात आली.

यावेळी झालेल्या सभेला राज्य अध्यक्ष शुभा शमीम, कोषाध्यक्ष आरमायटी इराणी, कार्याध्यक्ष संगीता कांबळे, मुंबईच्या अध्यक्षा स्नेहा सावंत, मीना मोहिते, संपदा सैद आदींनी मार्गदर्शन केले.



# भाजपचा पराभव निश्चित !

## रोहित पाटील : ताथवडे-वाकड-पुनावळे भागात प्रचार

।पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशाला रसातळाला पोहोचवण्याचे काम भारतीय जनता पक्षाने केले आहे. पेट्रोलचे भाव शंभराच्या पुढे गेले आहेत. गॅस सिलिंडरचे भाव हजाराच्या पार गेले आहेत. घरचे बजेट कोलमडले आहे. पण ही महागाई कमी करण्यासाठी सरकार कोणतीही पावले उचलत नाही. त्यामुळे जगायचं कसं? असा प्रश्न सध्या सामान्य माणसाला पडला आहे. जनतेला वाऱ्यावर सोडणाऱ्या आणि भ्रष्टाचारातून जमा केलेल्या खोक्यांच्या माध्यमातून लोकशाहीच धोक्यात आणणाऱ्या भाजपला पराभवाचा धक्का चिंचवडच्या पोटनिवडणुकीत नक्कीच बसणार असून महाविकास आघाडीचे नाना काटे विजयी होतील, असा विश्वास स्वर्गीय आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांनी व्यक्त केला.**



### भाजपाचा संवेदनाहीन कारभार...

**नागरिकांची आणि श्रमिकांची पिळवणूक सुरु आहे. त्याविरूद्ध दाद मागितली तर आज ताटात येणारी भाकरही जाण्याची भीती वाटत आहे, या साऱ्यामागे सरकारचा संवेदना नसलेला कारभार कारणीभूत आहे, त्याच्या विरोधात असणारा असंतोष व्यक्त करण्यासाठी संधी या निवडणुकीच्या माध्यमातून सामान्य मतदारांना मिळाली आहे. त्यामुळे या संधीचा वापर जनता नक्की करेल, असा विश्वास रोहीत पवार यांनी यावेळी व्यक्त केला.**

नाना काटे यांच्या प्रचारार्थ रहाटणी, वाकड, थेरगाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या पदयात्रेदरम्यान मतदारांशी संवाद साधताना रोहीत पाटील बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, 'सामान्य माणसाला देशाच्या, राज्याच्या हिताचा विचार करायला वेळच मिळू नये, अशी परिस्थिती भारतीय जनता पक्षाने निर्माण केली आहे. उद्योग क्षेत्र दोन कुटुंबांकडे एकवटले जाण्याची भीती आहे. सामान्य माणसाला आपल्या रोजी रोटीची खात्री राहिली नाही. पिचलेल्या सामान्य माणसांना उभारी देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणाविरोधात कणखरपणे उभे राहण्याची गरज आहे.'. सामान्य माणसाच्या मनामध्ये या सरकारच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या लालचीपणाविषयी प्रचंड राग आहे. हा राग मतपेटीतून नक्की बाहेर येईल आणि नाना काटे यांचा विक्रमी मतांनी विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पदयात्रेमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील, माजी नगरसेवक मयूर कलाटे, रेखा दर्शिले, संदीप पवार, सुप्रिया पवार, विजय दर्शिले, माजी सरपंच लक्ष्मण मोहिते, संभाजी शिंदे, सागर ओव्हाळ, राजाराम काटे, प्रकाश काटे, सुरेश रानवडे, किरण बोरगे, सुभाष कोयते, शिवाजी बांदल, अतुल काटे, सचिन झिंजुर्डे, राहुल काटे, ईश्वर ओव्हाळ, राजेंद्र गायकवाड, शांताराम बोडके, बाळासाहेब बोडके, अक्षय भुजबळ, श्रीकांत ढवळे, सुनील ढवळे यांच्यासह पुनावळेतील राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीतील विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

# आम्ही कृतघ्न नाही!

## पिंपळेगुरवकरांचा संकल्प : प्रत्येक मत दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या कार्याला

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वाधिक विकासकामे करणारे एकमेव नेते होते. त्यांनी पिंपळेगुरवला उभे केले. येथे विकासाची गंगा आणली. साधा रस्ताही नव्हता, त्यावेळी येथील जनतेने त्यांना निवडून दिले होते. जनतेचा विश्वास सार्थ ठरवत त्यांनी ३७ वर्षे शहराची सेवा केली. पिंपळेगुरवला त्यांनी कधीही काही कमी पडू दिले नाही. येथील अनेकांना त्यांनी मोठे केले. आज आमची त्यांच्या कुटुंबियांना गरज असताना आम्ही विरोधकांना मतदान करण्याचे स्वप्नात सुद्धा विचार करू शकत नाही. आम्ही एवढे पण कृतघ्न नाही की लक्ष्मणभाऊंनी केलेला पिंपळेगुरवचा विकास एवढ्या लवकर विसरू. आम्ही प्रत्येक मत लक्ष्मणभाऊंच्या विकासाला देऊन त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप आणि भाजपला एक लाखाच्या मताधिक्याने निवडून देणार असा निर्धार पिंपळेगुरवच्या जनतेने सोमवारी केला.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप, शिवसेना व मित्र पक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपळेगुरवमध्ये पदयात्रा काढून प्रचार केला. तसेच त्यांनी काही भागात कोपरा सभाही घेतल्या. नागरिकांशी संवाद साधून कमळ चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. पती दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या विकासकामांना मत द्या, असेही त्या नागरिकांना म्हणाल्या. यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या (आठवले गट) राज्याच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेवक शशिकांत कदम, सागर आंगोळकर, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य महेश जगताप, कावेरी जगताप, वैशाली जवळकर, रविना आंगोळकर, दुर्गा आदियाल, पंचशीला दुधारे, अमर आदियाल, राहुल जवळकर, शशिकांत दुधारे, सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी जगताप यांच्यासह भाजप, शिवसेना व मित्रपक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे पिंपळेगुरवमध्ये वास्तव्याला आहेत. त्यांचे एकत्रित कुटुंब पिंपळेगुरमध्येच राहते. त्यामुळे पिंपळेगुरवच्या जनतेशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी नगरसेवक म्हणून पिंपळेगुरवमधूनच राजकारणाला सुरूवात केली होती. पुढे त्यांनी या भागाचा न भूतो न भविष्यति असा कायापालट केला. या भागाला रस्ताही नव्हता त्यावेळेस ते नगरसेवक म्हणून निवडून आले होते. आता या भागाला चारही बाजूंनी रस्ते जोडले गेले आहेत. पिंपळेगुरवमध्ये प्रशस्त रस्ते, उद्याने, पुरेसे पाणी व इतर मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत. त्यांनी या भागाचा कायापालट करत असताना अनेकांना नगरसेवक बनवले. महापौर केले. स्थायी समिती सभापती केले. कित्येक शासकीय कमिट्यांवर अनेकांना संधी दिली.

या पार्श्वभूमीवर त्यांच्या निधनामुळे लागलेल्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी प्रचारानिमित्त संवाद साधल्यानंतर पिंपळेगुरवमधील अनेक लोकांच्या डोळ्यात पाणी आले होते. नागरिकांच्या डोळ्यांतील पाणी पाहून पतीच्या आठवणी दाटून आलेल्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांनीही डोळ्यातील अश्रूंना वाट मोकळी करून दिली. प्रचारादरम्यान जागोजागी भावुक वातावरण पाहायला मिळाले. पिंपळेगुरवमधील जनता कुटुंबातीलच सदस्य असल्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मनमोकळेपणाने त्यांच्याशी संवाद साधला. नियतीच्या पुढे कोणाचेही चालत नसल्यामुळे माझ्या पतीने केलेल्या विकासकामांमुळे मला मतदान करा, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

### पोटनिवडणूक बिनविरोध व्हायला पाहिजे होती...

जगताप कुटुंबावर आणि पिंपळेगुरवकरांवर ही वेळ यायला नको होती, अशा भावना पिंपळेगुरवच्या नागरिकांनी व्यक्त केल्या. ही पोटनिवडणूक बिनविरोध देऊन विरोधी पक्षाच्या नेत्यांनी लक्ष्मणभाऊंच्या कार्याला सलाम करायला हवा होता. पण दुटप्पी वागणाऱ्या या नेत्यांना लक्ष्मणभाऊ कधीच समजणार नाहीत. आता आम्ही त्यांना मतदानातून माणुसकी काय असते आणि लक्ष्मणभाऊ कोण होते, हे समजावून सांगणार असल्याचे पिंपळेगुरवमधील नागरिक अश्विनी लक्ष्मण जगताप यांना सांगत होते. पिंपळेगुरवची जनता कृतघ्न नाही. लक्ष्मणभाऊंनी केलेला विकास एवढ्या लवकर विसरणारे आम्ही नाही. लक्ष्मणभाऊंनी मोठे केलेले आपल्यातले काही जण विरोधकांचा झेंडा घेऊन नाचत असले तरी पिंपळेगुरवमधून शंभर टक्के मतदान भाजप आणि लक्ष्मणभाऊंच्या विकासाला, नेतृत्वाला करणार असल्याचा निर्धार नागरिकांनी केला.

# मतदानाचा अधिकार काढून घेण्याचा भाजपचा प्रयत्न !

## जयंत पाटील : नाना काटे यांना विजयी करण्याचे आवाहन

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाची राज्यघटना धोक्यात आली आहे. बीबीसी सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेवर धाड टाकून खरी माहिती दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. सामान्य माणसांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मताचा अधिकार काढून घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, खोक्यांच्या जोरावर पक्षाचे नाव, चिन्ह चोरी केली जात असल्याने लोकशाही वाचविण्याची जबाबदारी तुमच्या आमच्यावर आली आहे. पोटनिवडणुकीच्या माध्यमातून लोकशाही वाचविण्याची आणि भाजपला धडा शिकविण्याची आपणाला संधी प्राप्त झालेली असल्याने, नाना काटे यांना बहुमताने विजयी करा, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रहाटणी येथे झालेल्या सभेत केले.**



राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल ऊर्फ नाना काटे यांच्या प्रचारासाठी शिवसेना नेते भास्कर जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे, जयंत पाटील, सुभान अली शेख यांच्या सभेचे रहाटणी येथे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नाना काटे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे नेते व माजी मंत्री भास्कर जाधव, राष्ट्रवादीचे माजी मंत्री धनंजय मुंडे, चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे, राष्ट्रवादीचे निरीक्षक व मावळचे आमदार सुनील शेळके, युवा नेते रोहित आर.आर. पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांकचे प्रदेश सचिव सुभान अली शेख, सारंग श्रीनिवास पाटील, माजी आमदार विलास लांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जयंत पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, नाना काटे यांचा विजय ही काळ्या दगडावरची रेघ आहे. आपल्याला आता केवळ मताधिक्य वाढवायचे आहे.

राहुल कलाटे यांची उमेदवारी ही विरोधकांची मते विभागण्यासाठी भारतीय जनता पक्षानेच केलेली खेळी आहे. याची माहिती प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन त्यांनी केले. सीमेवर काही घडले ती माहिती लोकांपर्यंत पोहोचू नये, महागाई किती वाढली तरी त्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचू नये, याची व्यवस्था आणि तयारी भारतीय जनता पक्षाने बीबीसीवर छापा टाकून केली आहे. त्यामुळे त्यांना हवी तीच माहिती मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून बाहेर येणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना घरात जाऊन या गोष्टीची माहिती करून देण्याची आवश्यकता आहे.

> **राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी या भागाचा देशात सर्वाधिक विकास केला आहे. हा भाग आयटी हब होण्यासाठी शरद पवार व अजित पवार यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीनेच पिंपरी-चिंचवड समृद्ध झाले आहे. हे नागरिकांपर्यंत पोहोचवले गेले पाहिजे. देशातील लोकशाही संपविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे ही निवडणूक ही देशातील लोकशाही टिकविण्यासाठी महत्त्वाची निवडणूक आहे,**
> **- जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी.**

## संपादकीय »

# तो अंधार छेदतोय....!

***आपले जगणे हे कार्यकर्त्यांसाठी आदर्श निर्माण करणारे फारच कमी लोक राजकारणात आहे. सत्तेसाठी राजकारण करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. पण, आपल्यावर ज्यांनी विश्वास टाकून विधिमंडळात पाठविले आहे; त्या जनतेसाठी राजकारण करणाऱ्यांमध्ये सर्वात अग्रक्रमाने नाव घ्यावे असे एकमेव व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड साहेब!!***

रस्त्यावर ज्याची कारकिर्द घडते, असा माणूस कधीच रस्त्याला घाबरत नाही. अडथळ्यांची पर्वा त्याला कधीच नसते. डॉ. जितेंद्र आव्हाड नावाचा एक अवलिया असाच आहे. घरात अठराविश्व दारिद्र्य असलेल्या अन् सिन्नरमधून पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत आलेल्या एका हमालाचा नातू ते लाखोंचा पोशिंदा, हा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. प्रचंड मेहनत, निष्ठा आणि जनतेप्रती असलेला प्रामाणिकपणा या जोरावर डॉ. आव्हाड यांनी हा प्रवास केला आहे. त्यांचा हा प्रवास नक्कीच अनेकांना प्रेरणादायी तर आहेच; पण, त्यांच्यातील प्रकाशमान कर्तृत्वाचा प्रत्यय आणून देणाराही आहे. असं म्हटलं जातं की, शिक्षण हे जेवायला नव्हे तर जगायला आणि जगवायला शिकतं!

डॉ. आव्हाड यांच्या मातापित्याला हे गमक समजले होते. म्हणूनच डॉ. आव्हाड हे उच्चशिक्षित झाले अन् त्यातूनच या ठाण्याला, या राज्याला अन् देशाला आभाळ छेदणारे अन् अंधाराच्या आरपार पाहणारे नेतृत्व लाभले. सामाजिक क्षेत्रात काम करणारा नेता सत्तेच्या राजकारणात किती संवेदनशीलतेने काम करू शकतो, हे डॉ. आव्हाडांनी सन 2009 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजयी झाल्यानंतर लागलीच दाखवून दिले होते. आपण ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो, त्या भागाचा विकास केला तरच आपणाला लोकप्रतिनिधी म्हणवून घेण्याचा अधिकार आहे, अशी धारणा बाळगल्यामुळेच कधीकाळी ठाणे शहरावरुन ओवाळून टाकलेल्या कळवा-मुंब्रा भागाचा विकास त्यांनी केला आहे. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्याकडे पाहिल्यानंतर साधारणपणे सर्वच जण त्यांना "रांगडा गडी, आक्रस्ताळी माणूस" असेच म्हणत असतील. पण, या रांगड्या मनाच्या आत एक संवेदनशील राजकारणी दडलेला असल्याचे कळवा-मुंब्रावासिय आजही मोठ्या मनाने कबूल करीत आहेत. ज्या कळवा- मुंब्र्याला स्वत:ची ओळखच नव्हती. त्या कळवा- मुंब्र्यात आज जो विकास दिसत आहे. त्यामागे डॉ. आव्हाड यांचा 'आक्रस्ताळी' स्वभावच महत्वाचा ठरला आहे. आपल्या भागाचा विकास करण्यासाठी त्यांनी आक्रस्ताळी भूमिका घेऊन पुकारलेला 'संघर्ष'च या विकासकामांसाठी मैलाचा दगड ठरलेला आहे. आज कितीजणांना आठवत असेल हे माहित नाही. पण, ज्यावेळी हरीत वसई या संघटनेच्या याचिकेवरुन कळव्यातील हजारो लोकांचा निवारा जमीनदोस्त करण्याचे आदेश कोर्टाने दिले.



## आनंदी सकाळ

### या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात होते प्रगती...

आपला देह हा पंचभूतात्मक आहे, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही तत्त्वरूपाने असतात. वाहणारा वायू हा जडस्वरूप वायू आहे; मात्र तत्त्वरूपातील वायू किंवा पाणी हे यापेक्षा वेगळे आहे. मन हे वायू तत्त्वापासून, बुद्धी हे तेज, चित्त आकाश, तर अहंकार हा पृथ्वी तत्त्वापासून म्हणजे जडतत्त्वापासून बनला आहे. यातील मन चंचल आहे. ते भटकते. हा त्याचा दोष; पण जेथे दोष असतात, तेथे काही गुणही असतात. जसे चिकटणे हा हिंगाचा दोष असला, तरी तो योग्य पद्धतीने सेवन केल्यास तो जठररोग दुरुस्त करतो; तसेच चंचलता हा मनाचा दोष असला, तरी परमार्थाच्या दृष्टीने तोही उपयुक्त आहे. मन स्थिर असते, तर जीवनात घडलेली एखादी दु:खद घटना आपण मरेपर्यंत विसरलो नसतो. मन चंचल असल्यामुळे आपण जुने विसरून नव्या उभारीने जीवन सुरू करतो. ही नवी उभारी या चंचल मनामुळे येते, म्हणून चंचलता हा दोष व गुण असे दोन्ही आहे. या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात प्रगती होते.

# वन-जन-मन : नक्षलींशी लोकशाही मार्गाने संघर्ष






'वनाधिकार व पेसा हे दोन्ही कायदे जंगलात राहणाऱ्या आदिवासी व इतरांवर झालेला ऐतिहासिक अन्याय दूर करणारे आहेत. जंगलात राहून याच अन्यायाविरुद्ध लढण्याची भाषा आजवर नक्षली करत आले. त्यामुळे भविष्यात ते या कायद्याचे समर्थन करत लोकशाही प्रक्रियेत सामील होत असतील तर आनंदच आहे' तत्कालीन पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी हे उद्गार काढले गडचिरोलीतील लेखामेंढ्याला. २०११ मध्ये या गावात झालेल्या वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणी शुभारंभ कार्यक्रमातील हा प्रसंग. हा कायदा लागू करताना ऐतिहासिक चुकीची उघड व उदारपणे कबुली देणाऱ्या सरकारच्या मनात किमान यानिमित्ताने तरी नक्षलींना लगाम बसेल हा हेतू होताच. त्यामुळे देशभरात या कायद्याचे स्वागत करताना 'बंदूक का जबाब बांबू से देंगे' अशा घोषणा अनेक ठिकाणी दिल्या गेल्या. या कायद्यामुळे जंगलाचे अधिकार आदिवासींच्या हाती जातील. त्याचा फायदा घेत नक्षली आणखी गैरप्रकार करतील अशी भीतीही तेव्हा व्यक्त केली गेली. जे काही घडेल ते समोर बघू, नक्षली नेमके काय करतात तेही बघू अशीच भूमिका तेव्हा रमेश यांनी घेतली. नंतरच्या १५ वर्षांत नेमके काय झाले?

या मुद्यावर नक्षली नेमके कसे वागले याचा आढावा घेण्याआधी थोडे इतिहासात डोकावणे इष्ट ठरेल. नक्षलींचा उगम झाला तोच मुळात जमीनदारांच्या विरोधात भूमिपुत्रांच्या बाजूने दिलेल्या लढ्यातून. नक्षलबारी, श्रीकाकुलम, विशाखापट्टणमचे उठाव याच मुद्द्यावरचे. भूसुधार कायदे हवेत अशीच तेव्हाची मागणी. नंतर थंडावलेल्या या चळवळीने पुन्हा उभारी घेतली तेव्हा नक्षलींचे मुद्दे बदलले. मध्यभारतातले जंगल हे प्रभावक्षेत्र ठेवायचे असेल तर या भागात राहणाऱ्या आदिवासींच्या प्रश्नाला हात घालायला हवा असे लक्षात येताच जल, जमीन, जंगलचा नारा नक्षलींनी दिला. कायम अन्यायग्रस्त असलेल्या आदिवासींना तातडीने दिलासा देत चळवळीच्या बाजूने वळवायचे असेल तर तेंदूपाने व बांबू तोडणीत होणाऱ्या त्यांच्या आर्थिक पिळवणुकीकडे लक्ष द्यायला हवे हे नक्षलींनी बरोबर हेरले. ही ऐंशीच्या दशकातील घडामोड.

मग बंदुकीच्या बळावर नक्षलींनी वनउपज खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना, वनखात्याला वठणीवर आणण्याचा कार्यक्रम हाती घेतला.

# पाचवा वर्ण अस्पृश्यतेचा...

**'नकोसे झालेले लोक' हे संपादकीय (१९ ऑगस्ट) वाचल्यावर स्वत:ला माणूस म्हणून घेण्याची लाज वाटली. आपल्याकडे चार वर्णांमधला शेवटचा वर्ण 'शूद्र' म्हणून ओळखला जातो.**

वर्णव्यवस्थेच्या भेदभावाला आज कायद्याची मान्यता नसली तरी तथाकथित उच्चवर्णीय भारतीयांच्यात तो इतका भिनला आहे की त्या विकृतीचे दर्शन आपल्याला वारंवार अगदी हिंसक पद्धतीनेसुद्धा पाहायला मिळते. शिक्षकांच्या मडक्यातले पाणी प्यायला म्हणून एका दलित विद्यार्थ्याला शिक्षकाने मारण्याची घटना ताजी आहे.

पण या कथित शूद्रांच्यात आणखी एका वर्णाचा समावेश आपल्याला करावा लागेल. तो म्हणजे इस्लामी जनता. मुस्लिमांबद्दलचा हा वर्णभेद जागतिक आहे. अमेरिका, चीन, इस्रायल, भारत तसेच अनेक युरोपीय देश अशा अनेक देशांत या रोगाचा आढळ होताना दिसतो. जणू काही प्रत्येक मुस्लीम जन्मत:च गुन्हेगार असतो अशा तऱ्हेच्या कल्पना जनसामान्यांत इतक्या खोलवर रुजल्या आहेत की प्रत्येक मुस्लिमाकडे आपण संशयाने पाहायला हवे; त्यांना नोकऱ्या, शेजारच्या घरात राहायला जागा अशा साऱ्या सुविधा देणे टाळावे; आपल्या मुलाने किंवा (विशेषत:) मुलीने मुस्लीम व्यक्तीबरोबर लग्न करायचे ठरवले तर साऱ्या कुळाला बट्टा लागला; त्यासाठी मुलाला घराबाहेर काढले पाहिजे; किंवा ऑनर किलिंग केले पाहिजे अशा कल्पना इथे ठाम रुजल्या आहेत. एरवी सभ्य आणि सुसंस्कृत भासणारी माणसे मुस्लिमांबद्दल बोलू लागतात तेव्हा त्यांच्यात जणू काही सैतान संचारला आहे की काय असे वाटायला लागते. ऐकीव माहिती आणि काही सुटी उदाहरणे यांच्या साहाय्याने माणसे सरळसरळ सुतावरून स्वर्ग गाठतात. हे सगळे पाहून मन विषण्ण होते आणि आता तर भाजपच्या जोडीने आम आदमी पक्षानेदेखील या मुस्लिमद्वेषाच्या धगधगत्या कुंडात उडी घेतली आहे. रोहिंग्यांना दिल्लीत घरे देऊ नयेत, त्यामुळे दिल्लीकरांना धोका आहे; वाटल्यास भाजपने आपले शासन असलेल्या राज्यात रोहिंग्यांना राहायला जागा द्यावी असे वक्तव्य आप पक्षाचे आमदार सौरभ भारद्वाज यांनी केले आहे. (अर्थात दिल्लीतसुद्धा रोहिंग्यांना वसवले जाणार नाही असे गृहखात्याने स्पष्ट केल्याने सगळा वाद संपला आहे. भाजप आपल्या द्वेषाच्या संस्कृतीला पूर्णपणे जागला आहे.) 'मनमानी कारभाराबद्दल न्यायालयाने आयकर खात्यालाच दंड लावला' ही बातमी वाचली. भोंगळ आणि मनमानी कारभाराबद्दल आयकर आणि जीएसटी खाते यांच्यात जणू तीव्र स्पर्धा सुरू आहे. एका करदात्यांच्या प्रकरणामध्ये त्यांच्या भाड्याने दिलेल्या जागेचे भाडे त्यांच्या राहत्या घरासाठीदेखील मिळाले आहे असे दाखवून मोठी डिमांड काढली गेली. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये भागीदारी संस्थेला वैयक्तिक करदाता समजून त्यातून उद्भवणाऱ्या तथाकथित कारणांमुळे त्यांचे रिटर्न सदोष असल्याचे कळवले गेले. असे असंख्य प्रकार सीए आणि करसल्लागारांना रोज अनुभवास येत आहेत. सध्याचा कहर म्हणजे करदात्याच्या टॅक्स रिटर्नमध्ये रिफंड निघाला असेल तर, त्याला कधीच कळवल्या न गेलेल्या अनेक वर्षांच्या चुकीच्या थकबाक्या त्याच्या नावासमोर अचानक जन्मास येत आहेत. एका जेष्ठ नागरिक महिलेने वर्ष २०२१-२२ साठी रिफंड मागितला असता त्यांना चक्क २००५-०६ सालाची, कुठलाही आगापिछा न सांगितलेली, एक थकबाकी तुमच्या या रिफंडसमोर वळती करत आहोत असा मेल आला. आयकर खात्याच्या बव्हंशी

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पानसरेंच्या हल्लेखोरांना जेरबंद कधी करणार?

## भाकपचे "जवाब दो.." आंदोलन

। नाशिक महाईन्यूज ।

**कॉ. गोविंद पानसरे यांच्या खुनाच्या सुत्रधारांना सरकार जेरबंद कधी करणार? असा सवाल करत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व समविचारी पक्ष, संघटनांच्या वतीने देशभरात नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर 'जवाब दो...' आंदोलन करण्यात आले.**

### घटनेला आठ वर्षे पूर्ण झाली

.२० फेब्रुवारी २०१५ रोजी उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले. या घटनेला आठ वर्षे पूर्ण झाली मात्र अद्यापही या घटनेतील सुत्रधारांना अटक करण्यात आलेली नाही. आजपर्यंत तपास विशेष तपास पथक(एस. आय.टी.) कडे होता आणि आता तो दहशवाद विरोधी पथक(ए.टी.एस.) कडे सोपविण्यात आला आहे. आता एटीएसचे अधिकारी न्यायालयातच म्हणतात "तपास हाती घेताच फरार आरोपिंना शोधणे कठीण आहे". अशा टोलवाटोलवी मध्ये आणखी किती वर्षे लागणार असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

पानसरे यांना कोल्हापूर येथे त्यांच्या घराजवळ दि. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी त्यांच्यावर गोळया घालत हत्या करण्यात आली. २० फेब्रुवारी २०१५ रोजी उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले. या घटनेला आठ वर्षे पूर्ण झाली मात्र अद्यापही या घटनेतील सुत्रधारांना अटक करण्यात आलेली नाही. आजपर्यंत तपास विशेष तपास पथक(एस.आय.टी.) कडे होता आणि आता तो दहशवाद विरोधी पथक(ए.टी.एस.) कडे सोपविण्यात आला आहे. आता एटीएसचे अधिकारी न्यायालयातच म्हणतात "तपास हाती घेताच फरार आरोपिंना शोधणे कठीण आहे". अशा टोलवाटोलवी मध्ये आणखी किती वर्षे लागणार असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

या पूर्वी महाराष्ट्रात नरेंद्र दाभोळकर, कर्नाटकात गौरी लंकेश, कलबुर्गी या पुरोगामी प्रबोधनकारांनाही असेच संपविण्यात आले आहे. एकीकडे बिल्किस बानोच्या बलात्कारी गुन्हेगारांना मुक्त करण्यात येते, त्यांचे सत्कार सोहळे आयोजित केला जातात आणि दुसऱ्या बाजुला उपेक्षित समूहाची बाजू




घेणाऱ्या वयोवृद्ध विचारवंतांना संशयित म्हणून तुरुंगात ठेवण्यात येते. पानसरे यांच्या मारेकऱ्यांना जेरबंद करून त्यांना शिक्षा होण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे गृह खाते, त्यांच्या तपासयंत्रणांना कार्यक्षमतेने कामाला लावून न्यायालयास योग्य ते पुरावे सादर केले पाहिजेत.

या अनुषंगाने योग्य तपास करून सक्षम पुरावे सादर केले पाहिजेत अशी मागणी या आंदोलनानंतर जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. यावेळी राजू देसले, जिल्हा सहसचिव दत्तू तुपे, राज्य कौन्सिल सदस्य विराज देवांग, शहर सचिव तल्हा शेख, शहर सहसचिव कैलास मोरे, जयवंत खडताळे, अरुण घोडराव, हेमंत शिंदे, मनोहर पगारे, रफिक सैयद, पुनमचंद शिंदे, सुरेश गायकवाड, मीनाताई आढाव, दिनेश वाघ, रवी उल्लहारे, सचिन अल्हट, राजू नाईक, अवेश लोहिया, सुमित शर्मा व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# "...तर खासगी कारखानदारी रोखणं अशक्य

## सांगलीत राष्ट्रवादीचे अध्यक्षशरद पवार यांचं विधान

।सांगली। महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी खासगी कारखानदारीबद्दल मोठं विधान केलं आहे. सहकारी संस्था पूर्वीसारख्या चालवल्या तर त्या वाढतील, नाहीतर खासगी कारखानदारीला कुणीही रोखू शकणार नाही, असं विधान शरद पवारांनी केलं. ते सांगली येथे सहकारतीर्थ गुलाबराव पाटील जन्मशताब्दी वर्ष सांगता सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलत होते.**

या कार्यक्रमात केलेल्या भाषणात शरद पवार म्हणाले, सध्या पूर्वीसारखी सहकार क्षेत्रात परिस्थिती राहिली नाही. सहकार क्षेत्रात खासगी कारखानदारी येत आहे. खासगी आणि सहकारी कारखान्याची संख्या एकसमान आहे. पूर्वी सारखं सहकारी संस्था



चालवल्या आणि वाढवल्या तरच त्या टिकतील, अन्यथा खासगी कारखानदारीला कोणीही रोखू शकणार नाही, अशी चिंता शरद पवार यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांना 'सहकारतीर्थ गुलाबराव पाटील सन्मान पुरस्कार' देवून सन्मानित करण्यात आले. दरम्यान भाषण करताना शरद पवार यांनी सुशील कुमार शिंदे यांना विचारलं की, तुम्ही किती वेळा मुख्यमंत्री झाला होता? यावर सुशील कुमार शिंदे म्हणाले, "मी एक वेळा मुख्यमंत्री झालो होतो, पण पुन्हा मुख्यमंत्री होण्याची इच्छा नाही." यावर शरद पवार पुढे म्हणाले, "तुमचं काही सांगता येत नाही".

दोन्ही नेत्यांमधील संवादानंतर उपस्थित लोकांमध्ये हशा पिकला. याच कार्यक्रमातून भाजपाचे नेते आणि कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी काँग्रेसचे नेते व माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या कामाचं कौतुक केलं. दुसरीकडे, सहकार क्षेत्रातील विविध उणीवांची जाणीवही करून दिली.

> **सध्या पूर्वीसारखी सहकार क्षेत्रात परिस्थिती राहिली नाही. सहकार क्षेत्रात खासगी कारखानदारी येत आहे. खासगी आणि सहकारी कारखान्याची संख्या एकसमान आहे. पूर्वी सारखं सहकारी संस्था चालवल्या आणि वाढवल्या तरच त्या टिकतील, अन्यथा खासगी कारखानदारीला कोणीही रोखू शकणार नाही, अशी चिंता यांनी व्यक्त केली.** - शरद पवार

---

## ना कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी पैसा, ना शहराचा विकास,

# परभणी पालिकेची दयनीय अवस्था

। मुंबई ।महाईन्यूज ।

2011 ला परभणीची नगर परिषदेचे रूपांतर महानगरपालिकेत झाले आणि परभणीकरांच्या अपेक्षा उचांवल्या. मात्र 13 वर्षानंतर सध्याच्या शहराची परिस्थिती पाहता आपली नगरपरिषदच बरी होती असे म्हणण्याची वेळ परभणीकरांवर आल्याचं चित्र आहे. शहराचा विकास लांबच राहिला, पण कर्मचाऱ्यांचे पगार करायला देखील मनपाकडे पैसे नाहीत, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

परभणी शहराची लोकसंख्या तीन लाखांपेक्षा जास्त आहे. दिवसागणिक शहराचा विस्तार होतोय. मात्र सुविधा जैसे थेच आहेत. आजही शहरात अरुंद रस्ते, ठिकठिकाणी वाढलेले अतिक्रमण, बंद पडलेली सिग्नल व्यवस्था, अस्ताव्यस्त लागेलली वाहने अशा एक ना अनेक मूलभूत समस्यांनी परभणी शहर ग्रस्त आहे. नगरपरिषदेतून महापालिका झाल्यानंतर पहिल्यांदा राष्ट्रवादी नंतर काँग्रेसने शिवसेनेच्या मदतीने सत्ता स्थापन केली. मात्र ना शहराचा विकास झाला ना नागरिकांना मूलभूत




सुविधा मिळाल्या. आता मागच्या वर्षभरापेक्षा जास्त कालावधीपासून महापालिकेवर प्रशासक आहे. प्रशासकांना शहर विकासाची संधी असताना प्रशासक देखील केवळ बध्याची भूमिका बजावताहेत असे चित्र आहे.

परभणी शहरात प्रवेश करण्यासाठी चार प्रमुख रस्ते आहेत. कुठूनही शहरात प्रवेश केला तर रस्त्यावरील खड्डे आणि उडणाऱ्या धुळीने स्वागत होते. शहराचं वैभव असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा गरज नसताना सुशोभीकरण करण्यासाठी हाती घेण्यात आला. मात्र वर्ष होऊन गेले तरी त्याचे काम काही होईना. शहरात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पाणीपुरवठा योजना अद्याप पूर्ण नसल्याने कुठे भरमसाठ पाणी येतं तर कुठे पाणीच येत नाही. धुळीची समस्या एवढी मोठी आहे की कुठल्याही रस्त्यावर चक्कर मारली तर अख्खा चेहरा धुळीने माखला जातो. अनेक ठिकाणी मोकाट जनावरे रास्ता रोको करतात. नाला सफाई नाही, स्वच्छतेचे झालेले तीन तेरा या सर्वच समस्येमुळे आता विविध पक्ष संघटना आक्रमक होऊन आंदोलन करताहेत.

परभणी शहरात 16 वार्डात 65 प्रभाग आहेत. 70 ते 72 हजार मालमत्ताधारक, 22 हजार नळ कनेक्शन आहेत. मनपाला घरपट्टी, नळपट्टी, विविध कर, भाड्याने दिलेले संकूल, इतर इमारती असे मिळून महिन्याकाठी दीड ते दोन कोटी रुपये उत्पन्न मिळते.

# नक्षलवाद्यांचा पोलिसांवर हल्ला!

## दोन पोलीस शहीद, एक जखमी



।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**नक्षलवाद्यांनी गस्त घालणाऱ्या पोलिसांवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात घडली. नक्षलवाद्यांच्या या हल्ल्यात दोन पोलीस शहिद झाले असून, एक पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती मिळते. राजेश प्रतापसिंह आणि ललीत यादव अशी शहीद झालेल्या पोलिसांची नावे आहेत.**

महाराष्ट्र-छत्तीसगड राज्याच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगड राज्यातील बोरतलाव पोलीस चौकीअंतर्गत सकाळी 8.30 वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांवर नक्षलवाद्यांनी हल्ला केल्याची घटना छत्तीसगड राज्याच्या हद्दीत घडली. विशेष म्हणजे ही हद्द महाराष्ट्र सीमेच्या चेकपोस्टपासून सुमारे 50 मीटर अंतरावर आहे. या हल्ल्यानंतर संबंधित परिसरात पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

चहा पिण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर 10 ते 12 जणांच्या महिला-पुरुष नक्षलवाद्यांच्या टोळीने विनाशस्त्र हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. राजेश प्रतापसिंह आणि ललीत यादव अशी या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांची नावे आहेत.

या घटनेनंतर महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवर पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. तसेच, जंगलात सर्च ऑपरेशन सुरू केले आहे. दरम्यान, राजेश प्रतापसिंह आणि ललीत यादव आपल्या एका सहकारी मित्रासह मोटारसायकलने चहा पिण्यासाठी पोलीस चौकीपासून मुख्य राज्यमार्गावर असलेल्या ढाब्याकडे गेले होते. हे दोघेही बोरतलाव पोलीस चौकीतील पोलीस कर्मचारी आहेत.

दरम्यान, चहा पिण्यासाठी गेले असता त्या परिसरात असलेल्या नक्षलवाद्यांनी त्या पोलिसांवर गोळीबार केला. या गोळीबारात दोन पोलीस कर्मचाऱ्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. तर एक पोलीस कर्मचारी जखमी आहे. जखमी पोलीस कर्मचाऱ्यांमुळे सदर घटना पोलिसांना मिळाल्याची माहिती समोर आली आहे. नक्षल्यांनी मोटारसायकलला आग लावून घटनास्थळावरुन पोबारा केला.

### विनाशस्त्र हल्ला केल्याची माहिती?

**चहा पिण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर 10 ते 12 जणांच्या महिला-पुरुष नक्षलवाद्यांच्या टोळीने विनाशस्त्र हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. राजेश प्रतापसिंह आणि ललीत यादव अशी या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांची नावे आहेत.**

---

# निवडणूक आयोगाविरोधात उद्धव ठाकरे सुप्रीम कोर्टात

## ठाकरेंचीअखेरची झुंज: सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली



।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष व धनुष्यबाण शिंदे गटाला कायमस्वरुपी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या याचिकेद्वारे उद्धव ठाकरे हे शिवसेना पक्ष पुन्हा मिळवण्यासाठी अखेरची झुंज देत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय या याचिकेवर काय निर्णय देणार?, हे फार महत्त्वाचे ठरणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या नावाने ॲड. अभिषेक मनू सिंघवी यांनी ही याचिका दाखल केली आहे. जाणून घेऊया, या याचिकेत नेमके काय म्हटले आहे? 5 महत्त्वाचे मुद्दे.

### 1) शिवसेना कार्यकारिणीची निवड लोकशाही मार्गाने

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या कार्यकारिणीची निवड लोकशाही मार्गाने झाली नाही, असा ठपका ठेवत शिवसेनेची घटनाच नियमबाह्य ठरवली आहे. यावर याचिकेत म्हटले आहे की, 4 एप्रिल 2018 रोजी शिवसेनेच्या कार्यकारिणीचीच निवड करण्यात आली. शिवसेना सचिव अनिल देसाई यांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही निवडणूक नियमांप्रमाणे घेतली होती. त्याचा व्हिडिओ पुरावा व मतदानाच्या प्रक्रियेबाबतचे सर्व कागदपत्रे आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगासमोर दाखल केले होते. मात्र, निवडणूक आयोगाने या पुराव्यांची दखल न घेताच कार्यकारिणीची निवड लोकशाही मार्गाने झाली नसल्याचे म्हणत तिला रद्द केले.

### 2) शिंदे व ठाकरेंसाठी वेगवेगळी घटना नाही

2018मध्ये शिवसेनेच्या घटनेत एकतर्फी बदल करण्यात आला, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे. यावर याचिकेत ठाकरे गटाने म्हटले आहे की, कार्यकारिणीची लोकशाही पद्धतीने निवड केल्यानंतर त्यांच्या संमतीनेच घटनेत पक्षप्रमुख हे पद तयार करण्यात आले. तरीही, लोकशाही पद्धतीने घटना बदलली नाही, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. तसेच, घटनेतील बदल नियमबाह्य असतील तर त्याच घटनेनुसार एकनाथ शिंदे यांना नेतेपद देण्यात आले होते. घटना नियमबाह्य असेल तर एकनाथ शिंदे यांची घटनेनुसार नेतेपदावर केलेली निवड निवडणूक आयोगाने योग्य कशी ठरवली? एकनाथ शिंदेंची नेतेपदी निवड योग्य असेल तर त्याच घटनेनुसार उद्धव ठाकरे यांच्या गटासाठी घटना चुकीची कशी ठरू शकते?, असा सवाल याचिकेत केला आहे. उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे यांच्यासाठी घटनेचा वेगवेगळा अर्थ लावता येणार नाही, असे याचिकेत म्हटले आहे.

### 3) पराभूत उमेदवारांची मते का नाही मोजली?

शिवसेना कुणाची? यावर निर्णय देताना निवडणूक आयोगाने आमदार, खासदारांच्या मताला महत्त्व दिले. बहुमताला महत्त्व असल्याचे आयोगाने म्हटले आहे. आपल्या निकालात आयोगाने म्हटले की, शिंदे गटाकडे 55 आमदारांचे मत आहे. तर, ठाकरे गटाच्या बाजूने केवळ 15 मते आहेत. यावर ठाकरे गटाने याचिकेत म्हटले आहे की, केंद्रीय निवडणूक आयोगाने केवळ निवडणुकीत जिंकलेल्या आमदार, खासदारांची मते ग्राह्य धरली आहेत. मात्र, निवडणुकीत जे उमेदवार पराभूत झालेत, त्यांची मते निवडणूक आयोगाने का मोजली नाहीत. या उमेदवारांनाही लाखोंच्या जनसंख्येने मते दिली आहेत. याशिवाय लाखो कार्यकर्ते अजूनही उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहे. मात्र, या बाबींचा निवडणूक आयोगाने विचारच केला नाही. केवळ आमदार, खासदारांच्या बहुमताच्या आधारावर पक्ष कोणाचा हे ठरवता येणार नाही.

### 4) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना निकाल नको

शिवसेना नाव व पक्षचिन्हाबाबत निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय स्थगित करावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी ठाकरे गटाने याचिकेत केली आहे. याचिकेत ठाकरे गटाने म्हटले आहे की, बंडखोर आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्याआधीच केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्ष कोणाचा? यावर निकाल देणे चुकीचे आहे. उद्या आमदार अपात्र ठरल्यास यातून कायदेशीर पेच निर्माण होऊ शकतात. त्यामुळे बंडखोर आमदारांच्या पात्रतेबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतरच निवडणूक आयोगाने शिवसेना कुणाची? यावर निर्णय द्यावा. तोपर्यंत दिलेला निर्णय स्थगित करावा, असे ठाकरे गटाने म्हटले आहे.

### 5) 1999च्या घटनेनुसार निर्णय दिला

याचिकेत शेवटी ठाकरे गटाने म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने शिवसेना कुणाची?, हा वाद मिटवला, पण त्याचा आधार पक्षाची 1999 ची घटना होती. मात्र, 2018 मध्ये पक्षाच्या घटनेत दुरुस्ती केली होती. 2018 च्या घटनेनुसार शिवसेनेचा अध्यक्ष पक्षात सर्वोच्च असेल. पक्षातून कोणाची हकालपट्टी करणे, वार्षिक सभा घेणे किंवा पक्षात कोणाचाही समावेश करणे याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार पक्षाध्यक्षांनाच आहे. 1999 च्या पक्ष घटनेनुसार पक्षप्रमुखांना असे कोणतेही अधिकार नव्हते.

### शिंदे गटाचीही कॅव्हेट याचिका

**दरम्यान, निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाकडून आव्हान दिले जाण्याची शक्यता गृहित धरून शिंदे गटाने यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. आमचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय निर्णय देऊ नये, अशी विनंती शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयाला केली आहे. निवडणूक आयोगाच्या विरोधातील याचिकेवर उद्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होण्याची शक्यता आहे. यादरम्यान, ठाकरे व शिंदे गटात जोरदार खडाजंगी पाहायला मिळेल.**



# बाबो, काही खरं नाही! गौतमी पाटीलचा 'खान्देश कन्या' म्हणून सन्मान..

सध्या महाराष्ट्रामध्ये गौतमी पाटील माहीत नाही असं कुणीही नसेल. तिचे नृत्य इतके व्हायरल आणि वादग्रस्त ठरले की मंत्रालयापासून तर सामान्य माणसांच्या घराघरात हे नाव पोहोचलं. अश्लील नृत्य करते म्हणून गौतमी वर सडकून टीका झाली. काही राजकीय पक्षांनीही तिच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली.

एवढेच नाही तर गौतमीचा नाच पाहून राज्यभरातील लावणी कलावंत संतापले होते. पण असे असतानाही गौतमीचा चाहतावर्ग काही कमी झालेला नाही. राज्यभरातून अनेक धनाढ्य माणसं लाखों रुपये मोइून गौतमीचा कार्यक्रम घेत आहेत. तिच्या नृत्यावरून सुरू झालेला वाद अद्याप ही ताजा असतानाच गौतमीला थेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. गौतमी पश्चिम महाराष्ट्रात गाजत असली तरी ती मूळची धुळे- खान्देश इथली आहे. म्हणून खांदेशात एका भव्य कार्यक्रमात गौतमीचा 'खान्देश कन्या' म्हणून गौरव करण्यात आला. या संदर्भात स्वतः गौतमीने एक पोस्ट केली आहे, "माजी मंत्री तथा आमदार मा. श्री. जयकुमारभाऊ रावल यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार मा. श्री. जयकुमारभाऊ रावल यांच्या हस्ते माझा खान्देश कन्या म्हणून गौरव करून सत्कार करण्यात आला. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, असाच मायेचा हात सदैव माझ्या पाठी राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना... जय खान्देश!

# शिव ठाकरे बड्या स्टारसह लवकरच झळकणार चित्रपटात


टीव्हीवरील सर्वात वादग्रस्त शो बिग बॉसचं १६ पर्व आता संपलं आहे आणि यात पुण्याचा रॅपर एमसी स्टॅनने बाजी मारत विजेतेपदावर स्वतःचं नाव कोरलं. अखेरीस शिव ठाकरे आणि एमसी स्टॅन यांच्यात चुरशीची लढत होती. पण त्यात शिव ठाकरेला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर शिव ठाकरेने यावर प्रतिक्रिया दिली आहे. अखेरच्या क्षणी हार झाल्यानंतर काय वाटलं हे शिव ठाकरेने सांगितलं आहे.

बिग बॉस मराठीचं विजेतेपद जिंकल्यानंतर शिव ठाकरे आता बिग बॉस १६चं विजेतेपद जिंकेल अशी आशा सर्वांनाच वाटत होती. मात्र असं झालं नाही. अखेरच्या क्षणी एमसी स्टॅनला विजेता घोषित करण्यात आलं आणि शिव ठाकरे रनरअप ठरला. 'बिग बॉस'मुळे प्रचंड प्रसिद्धी मिळवलेला शिव ठाकरे हा सोशल मीडियावर चांगलाच सक्रिय असतो. त्याच्या चाहत्यांच्या तो सतत संपर्कात असतो. नुकतंच त्याने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटच्या माध्यमातून लाईव्ह येत चाहत्यांशी संवाद साधला. अंधेरीच्या एक कॅफेमध्येच शिव ठाकरेने चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी बऱ्याच चाहत्यांना त्याने उत्तरं दिली अन् काही चाहत्यांशी व्हिडिओच्या माध्यमातूनही संवाद साधला. दरम्यान शिव ठाकरेने एक मोठं सरप्राइजदेखील त्याच्या चाहत्यांना दिलं आहे. या संभाषणादरम्यान शिवने लवकरच एका मोठ्या चित्रपटात काम करणार असल्याची घोषणा केली आहे. याबद्दल विशेष काहीच सांगितलं नसलं तरी या मोठ्या चित्रपटात शिव ठाकरे एक बड्या स्टारसह झळकणार आहे. यासाठी शिवचे चाहते चांगलेच उत्सुक आहेत.



लवकरच तो याबद्दल अधिकृत माहिती देणार असल्याचंही त्याने स्पष्ट केलं आहे. आता नेमका तो स्टार आणि तो चित्रपट कोणता? हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

# फेम अभिनेत्री अश्विनी महांगडेचं शिवप्रेम पाहून वेडे व्हाल



आई कुठे काय करते मालिकेत अनघाची भूमिका साकारत आहे अभिनेत्री अश्विनी महांगडे. अश्विनीने साकारलेली अनघाची भूमिका प्रचंड लोकप्रिय झाली आहे.मालिकेत अनघाचं अभिशी असलेलं नातं आणि सासू अरुंधती सोबत असलेलं भावनिक नातं चर्चेत असतं. अश्विनी तिच्या संस्थेतून सामाजिक भान जपत असते. शिवजयंती निमित्त अश्विनीने एक खास गोष्ट केलीय त्याची सर्वत्र चर्चा आहे.अश्विनी रयतेचं स्वराज्य संस्थान प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था चालवते. या संस्थेअंतर्गत अश्विनी विविध सामाजिक उपक्रम राबवत असते. अश्विनीने तिच्या संस्थेअंतर्गत शिवजयंती साजरी केली. हि शिवजयंती विशेष चर्चेत राहिली.

अश्विनीच्या संस्थेतर्फे वाईला एका मैदानात शिवजयंती साजरी करण्यात आली. या मैदानात खास JCB आणण्यात आला.अश्विनी स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेत राणूअक्कांच्या भूमिकेत झळकली. या मालिकेपासून अभिनेत्री अश्विनी महांगडे हिची भूमिका प्रचंड लोकप्रिय झाली. अश्विनी खऱ्या आयुष्यात सामाजिक भान जपणारी संवेदनशील अभिनेत्री आहे. रयतेचं स्वराज्य संस्थान प्रतिष्ठानच्या अंतर्गत अश्विनी तिच्या गावी अनेक सामाजिक उपक्रम राबवत असते. त्यामुळे अश्विनीचं खूप कौतुक होत असतं. अश्विनी सध्या आई कुठे काय करते मालिकेत काम असून हि मालिका सोमवार ते शनिवार ७.३० वाजता स्टार प्रवाह वर पाहायला मिळेल. मधुराणी प्रभुलकर, मिलिंद गवळी, ओंकार गोवर्धन, इला भाटे अशा कलाकारांच्या कुठे काय करते मालिके महत्वाच्या भूमिका आहेत.



# आई की मोठी बहिण? कियारासोबतच्या ती आहे कोण?

कियारा आणि सिद्धार्थचं काही दिवसांपूर्वी राजस्थानमध्ये झालेला शाहीविवाह सोहळा अजून चाहते विसरले नाहीत. सोशल मीडियावर त्यांच्या लग्नाच्या फोटोला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. लग्नाच्या एका व्हिडिओवर लाखो व्ह्युज आणि हजारो कमेंटसने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. आता कियाराचा आणखी एक व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यावर नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंट्स भन्नाट आहे. जैसलमेर मध्ये झालेल्या या लग्नसोहळ्याला बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटी उपस्थित होते. त्यांच्या रिसेप्शनला तारे तारकांची उपस्थिती ही चर्चेचा विषय होता. इंस्टावरील अभिनेत्रीच्या त्या पोस्टवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. कियाराचा तिच्या आईसोबतचा फोटो हा प्रतिक्रियांचा विषय ठरतो आहे. कित्येकांनी तर ती कियाराची आई नसून तिची थोरली बहिण आहे. असं समजून तिला प्रतिक्रिया दिली आहे.



कियाराच्या लेटेस्ट फोटोमध्ये तिनं पिंक कलरचा ड्रेस परिधान केला आहे. त्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसते आहे. कियाराचा तो स्टनिंग लूक पाहून चाहते खूश झाले आहेत. त्यात तिनं जिच्यासोबत फोटो काढला आहे त्यामुळे ती चर्चेत आली आहे. कियारानं त्या फोटोमध्ये आपल्या बहिणीला बरोबर घेतले आहे आणि ती देखील तिच्याइतकीच सुंदर आहे. अशा प्रतिक्रिया समोर आल्या आहेत.एका नेटकऱ्यानं तर ही कियाराची आई नसून तिची थोरली बहिणच दिसते आहे. अशा शब्दांत त्या फोटोवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. दुसऱ्यानं तुम्हा दोघांनाही खूप साऱ्या शुभेच्छा. तुम्ही दोघीही खूप सुंदर दिसता आहात.

# रोहित शर्माने रचला मोठा विक्रम!

## धोनी आणि बाबरच्या 'या' विक्रमाशी केली बरोबरी

।मुंबई।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**टीम इंडियाने रविवारी दिल्लीत खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६ विकेट्सने दणदणीत विजय नोंदवला. या विजयानंतर टीम इंडियाने चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. या विजयाचा टीम इंडियाला अभिमान आहे आणि विशेषतः कर्णधार रोहित शर्माच्या कर्णधारपदावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अशात कर्णधार रोहितनेही आपल्या नावावर एक मोठा विक्रम नोंदवला आहे.**




टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा सलग ४ कसोटी सामने जिंकणारा जगातील तिसरा कर्णधार ठरला आहे. त्याने या बाबतीत माजी कर्णधार एमएस धोनी आणि पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम यांची बरोबरी केली. धोनी आणि बाबर यांच्यासोबत गेल्या ५० वर्षात सलग ४ कसोटी जिंकणारा रोहित कर्णधार ठरला. ऑस्ट्रेलियाविरुद्धचे दोन कसोटी सामने जिंकण्यापूर्वी टीम इंडियाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेविरुद्धची दोन सामन्यांची कसोटी मालिका जिंकली होती. मार्च २०२२ मध्ये श्रीलंकेला भारत दौऱ्यावर झालेल्या दोन्ही सामन्यांमध्ये त्याला पराभवाचा सामना करावा लागला होता. टीम इंडियाने पहिली कसोटी २३८ धावांनी आणि दुसरी २२२ धावांनी जिंकली. अशाप्रकारे रोहितने त्याच्या नेतृत्वाखाली सलग चार कसोटी सामने जिंकून क्रिकेट इतिहासात आपले नाव नोंदवले आहे.

### डब्ल्यूटीसी अंतिम फेरीतील स्थान जवळपास निश्चित

**मात्र, या विजयानंतर एकीकडे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) फायनलमधील टीम इंडियाचे स्थान जवळपास निश्चित झाले आहे, तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियासाठी धोका वाढला आहे. १ मार्चपासून इंदूरच्या होळकर स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्यात कोणता संघ बाजी मारतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.**



# भारताला हरवणे कठीण! पाकिस्ताननेही ओळखली टीम इंडियाची ताकद!!

## माजी PCB प्रमुखांची ऑस्ट्रेलियावर सडकून टीका

।बंगाल ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलिया संघाला भारताविरुद्धच्या सलग दुसऱ्या कसोटी सामन्यात पराभव स्वीकारावा लागला. पहिल्या कसोटी सामन्यात भारताने एक डाव आणि १३२ धावांनी विजय मिळवला होता. तर दुसऱ्या कसोटी सामन्यात पाहुण्या ऑस्ट्रेलियन संघाला ६ विकेट्सच्या अंतराने पराभव स्वीकारावा लागला. ऑस्ट्रेलियाचा दिग्गज वेगवान गोलंदाज आणि संघाचा कर्णधार पॅट कमिन्स याने संघाच्या दोन चुका दाखवून दिल्या, ज्यामुळे त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

दिल्लीतील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा पराभव केल्याबद्दल रमीझ राजाने टीम इंडियाचे कौतुक केले आहे. माजी खेळाडूने सांगितले की तीन दिवसात भारताच्या विजयाने ऑस्ट्रेलिया उपखंडातील संघांना






त्यांच्या घरी पराभूत केल्याची आठवण करून दिली. राजा म्हणाले की, "नुकत्याच संपलेल्या सामन्यात फिरकीपटूंविरुद्ध १६ विकेट्स गमावल्यापासून ऑस्ट्रेलियन फलंदाज तांत्रिकदृष्ट्या कशा चुकीच्या पद्धतीने बाद झाले यावर संघ व्यवस्थापनाने विचार करणे गरजेचे आहे. अशी फलंदाजी स्पिनर्सविरुद्ध पाहून मी चक्रावून गेलो हे फार भयंकर आहे. लवकरच यात सुधारणा करणे आवश्यक आहे."रमीझ राजांची ऑस्ट्रेलियन संघावर सडकून टीका

रमीझ राजा म्हणाले,"ऑस्ट्रेलिया स्वतःच्या कृतीचे फळ भोगत आहे. ते पर्थ किंवा ब्रिस्बेनमधील आशियाई संघांना तीन दिवसांत हरवून खेळ संपवायचे. भारतात चांगले क्रिकेट खेळण्याचा प्रश्न येतो तेव्हा ऑस्ट्रेलियन खेळाडू तयार नसतात. तुमच्या देशात म्हणजेच इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीजमध्ये जसे आशियाई संघांना वागवतात तसेच त्यांची अवस्था इथे होते. मी खेळपट्ट्यांबाबत बोलत आहे."

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष भारताचे कौतुक करताना म्हणाले की, "अक्षर पटेलने अश्विनसोबत केलेली ११५ धावांची भागीदारी केली हा खेळाचा टर्निंग पॉइंट होता. अक्षर पटेलने ७० धावा केल्या आणि रविचंद्रन अश्विनसोबत सामना जिंकण्याची भागीदारी केली. ऑस्ट्रेलियन खेळाडू अप्रस्तुत होते आणि फिरकीपटूंविरुद्ध त्यांची कामगिरी खराब होती." राजा पुढे म्हणाले की, "पाकिस्तानच्या विपरीत, भारताने केवळ खेळण्याची परिस्थितीच योग्य ठेवली नाही तर खेळातील त्यांच्या रणनीतींनाही पाठिंबा दिला." रमीझ पुढे म्हणाले, "भारताला फिरकीच्या खेळपट्ट्यांवर हरवणे जवळजवळ अशक्य आहे. बीसीसीआयची रणनीती खूप यशस्वी झाली आहे. पाकिस्ताननेही फिरकीचे ट्रॅक तयार करून प्रतिस्पर्ध्याला हरवण्याचा प्रयत्न केला, मात्र तसे झाले नाही. भारताला केवळ परिस्थितीची साथ मिळाली नाही तर त्यांनी ऑस्ट्रेलियन फलंदाजी आक्रमणाचा धुव्वा उडवत स्वतःच्या गोलंदाजांवरील प्रतिभेवरही भरवसा ठेवला."

# डकवर्थ लुईस नियमाने भारताचा आयर्लंडवर 5 धावांनी विजय

## टीम इंडियाचा उपांत्य फेरीत प्रवेश





। नवी दिल्ली । महाईन्यूज
। वृत्तसंस्था ।

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील १८ वा सामना भारत आणि आयर्लंड संघात खेळला गेला आहे. या सामन्यात भारतीय संघाने डकवर्थ लुईस नियमानुसार ५ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १५५ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर आयर्लंड संघाला १५६ धावांचा पाठलाग करताना पावसामुळे आलेल्या व्यत्ययामुळे ८.२ षटकांत २ बाद ५४ धावाच करता आल्या.

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील १८ वा सामना भारत आणि आयर्लंड संघात खेळला गेला आहे. या सामन्यात भारतीय संघाने डकवर्थ लुईस नियमानुसार ५ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १५५ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर आयर्लंड संघाला १५६ धावांचा पाठलाग करताना पावसामुळे आलेल्या व्यत्ययामुळे ८.२ षटकांत २ बाद ५४ धावाच करता आल्या.

पावसामुळे सामना थांबण्यापूर्वी ८.२ षटकांत २ बाद ५४ धावाच करता केल्या होत्या. ज्यामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार आयर्लंड संघ टीम इंडियाच्या ५ धावांनी मागे होता. याचाच फटका आयर्लंड संघाला बसला. अशा पद्धतीने भारतीय संघाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. भारतीय संघाकडून स्मृती मंधानाने सर्वाधिक धावा केल्या. मंधानाने ५६ चेंडूत सामना करताना ९ चौकार आणि ३ षटकाराच्या मदतीने ८७ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. त्यामुळे टीम इंडियाला मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले.